# अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता : एक अध्ययन

प्रा. अमोल भाऊराव बंड

सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र)आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि. अमरावती.

..........................................................................................................................

**सारांश :**

जगामध्ये जागतिक पातळीवर दोन महायुद्धे झाली. आणि ह्या दोन्ही महायुद्धांनी जगाची अपरिमित मनुष्यहानी व वित्तहानी केली. त्यामुळे या महायुद्धाचे वाईट परिणाम जगाला भोगावे लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये दोन प्रकारचे गट निर्माण झाले. एक म्हणजे भांडवलवादी लोकशाही राष्ट्रांचा गट ज्याचे नेतृत्व अमेरिका करीत होती व दुसरा गट म्हणजे साम्यवादी राष्ट्रांचा ज्याचे नेतृत्व सोव्हियत संघ (रशिया) करत होता आणि यांच्यामध्ये सत्तास्पर्धा किंवा वर्चस्व स्पर्धा सुरू झाली आणि त्यालाच म्हणतात शीतयुद्ध. शीतयुद्ध म्हणजे विचाराचे युद्ध दोन्ही गटांनी आपल्या राष्ट्राचे सैनिकी गट निर्माण केले आणि जगामध्ये अविश्वासाचे, संशयाचे वातावरण तयार झाले. तिसरे महायुद्ध होते की काय अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हाच जगामध्ये एक विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी, युद्ध थांबविण्याचा प्रयत्न करण्यासाठी, न्यायपूर्ण वातावरण तयार करण्यासाठी एक चळवळ अस्तित्वात आली ती म्हणजे अलिप्ततावादी चळवळ. अलिप्तता या शब्दाचा शब्दप्रयोग सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९५४ मध्ये कोलंबोतील एका भाषणात केला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरुपाच्या या गटा-तटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे, होकारात्मक तटस्थता असा अर्थ अलिप्ततेचा लावता येईल.अलिप्ततावादी धोरणाचे स्पष्टीकरण करतांना नेहरू म्हणतात. “कोणत्याही राष्ट्राचे अंकित म्हणून न राहता आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेऊ. आम्ही सत्ता-गटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका, रशिया या महासत्तांच्या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान प्राप्त करता येईल.”

यावरून आपल्याला अलिप्तता वाद म्हणजे काय तर अलिप्ततावादी राष्ट्रांना कोणत्याही दोन गटांमध्ये सामील व्हायचे नव्हते. परंतु अलिप्तता म्हणजे पूर्णपणे तटस्थता नाही जे पहिल्या महायुद्धापूर्वी अमेरिकेने दाखविली होती. पहिल्या महायुद्धापर्यंत अमेरिका हे राष्ट्र पूर्णपणे तटस्थ होते. त्याचप्रमाणे अलिप्तता म्हणजे स्विर्त्झलॅण्ड सारखी नाही. तर अलिप्ततावाद म्हणजे या दोन्ही गटांपैकी जर कोणी इतर देशांचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व यावर गदा आणत असेल, मानवतावाद विरोधी कार्य करीत असेल तर अलिप्ततावादी गट हा प्रसंगानुरूप न्यायपूर्ण किंवा योग्य गटाला समर्थन देईल. व अन्याय करणाऱ्या गटाला विरोध करेल. अशाप्रकारे अलिप्ततावाद म्हणजे सत्याचे, योग्यतेचे न्यायपूर्ण वातावरण व शांततेचे समर्थन करणारी चळवळ होती. म्हणून अलिप्ततावादी चळवळीने जगामध्ये शांतता निर्माण करण्याचे, युद्ध थांबविण्याचे व सत्ता स्पर्धेला आळा घालण्याचे कार्य केले. आजही जरी शीतयुद्ध थांबले असे आपण म्हणत असू तरीही आजही शीतयुद्ध अस्तित्वात आहेच. त्यामुळे अलिप्ततावादी चळवळीचे महत्व वाढलेले आहे. असे सांगता येईल.

**प्रस्तावना :**

मानवाचे रक्षण करण्यासाठी शस्त्रांचा शोध लागला. परंतु त्याच शस्त्रांमुळे मानव जातीची अपरिमित हानी झाली आहे. जगामध्ये आज पर्यंत दोन महायुद्धे झाली. व या महायुद्धाचे वाईट परिणाम जगास भोगावे लागले. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जगाला एका नवीन समस्येला तोंड द्यावे लागले ते म्हणजे शीतयुद्ध. महायुद्धातील विजयी राष्ट्रांमध्ये सत्तास्पर्धा किंवा वर्चस्व स्पर्धा निर्माण झाली. संपूर्ण जगामध्ये दोन गट निर्माण झाले. एक म्हणजे अमेरिका प्रणित भांडवलशाही लोकशाही गट व दुसरा म्हणजे सोव्हियत संगप्रणित समाजवादी गट अशाप्रकारे या दोन गटांमध्ये मोठ्या प्रमाणात सत्तास्पर्धा वाढली. या दोन्ही गटांनी जगातील जास्तीत जास्त राष्ट्रांना आपल्या गटांमध्ये सामील होण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब केला. प्रसंगी दबाव, सैन्य, विचारसरणी या मार्गाचा सुद्धा अवलंब केला. त्याच प्रकारे या दोन्ही गटांनी आपआपल्या गटातील राष्ट्रांसोबत वेगवेगळे सैनिक करार सुद्धा केले. उदा. अमेरिकेने नाटो, रशियाने वारसा संधी ज्यामुळे जगामध्ये एक प्रकारचे भितीदायक वातावरण तयार झाले. जणू तिसरे महायुद्ध होते की काय अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हाच एक आशेचा किरण अस्तित्वात आला तो म्हणजे अलिप्ततावादी चळवळ.

**अलिप्ततावादाचा अर्थ :**

अलिप्ततावाद या शब्दाचा अर्थ जाणून घेण्यासाठी खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करता येईल.

**जॉर्ज लिस्काच्या मते :**

"कोणत्याही नवोदित स्वतंत्र झालेल्या राज्यांने कोणत्याही सत्ता गटात सामील न होता स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आणि स्वतःच्या राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्वीकारलेले स्वतंत्र धोरण म्हणजे अलिप्तता होय."

काही टीकाकारांनी व पाश्चात्त्य विचारवंतांनी अलिप्तता या शब्दांचा अर्थ तटस्थता असाच लावला. जे की दुसऱ्या महायुद्धापूर्वी अमेरिकेने स्वीकारले होते. अमेरिका दुसऱ्या महायुद्धापूर्वी आपल्या भौगोलिक क्षेत्रात बंद होता. अलिप्तता म्हणजे अशाप्रकारची तटस्थता नाही.

अन्याय होत असताना बघ्याची भूमिका घेणे नाही. तर अलिप्ततावादी चळवळीची भूमिका ज्या राष्ट्रावर अन्याय झालेला आहे त्याला मदत करणे. असेच जे राष्ट्र अन्यायी आहे त्याला विरोध करणे. पंडित नेहरुंनी त्याबाबत अधिक स्पष्टपणे सांगितले की, "जर स्वातंत्र्यावर गदा येत असेल, न्यायाची हत्या होत असेल, आक्रमण होत असेल तर त्यावेळी भारत तटस्थ राहणार नाही. राहू शकत नाही" म्हणजेच एखाद्या राष्ट्राचे स्वातंत्र्य दुसऱ्या राष्ट्राने केलेल्या आक्रमणामुळे संपत असेल तर अन्याय होणाऱ्या राष्ट्राला भारत मदत करेल. त्याचप्रकारे अलिप्तता म्हणजे तटस्थत्ता किंवा निष्क्रियता नाही तर न्यायोचित बाजू घेणे व अन्यायाच्या विरोधात उभे राहणे.

अशाप्रकारे दुसऱ्या महायुद्धानंतर जे राष्ट्र आशिया व आफ्रिका खंडातील गुलाम राष्ट्र होते ते स्वतंत्र झाले व या राष्ट्रांनीच अशाप्रकारची अलिप्ततावादी संघटना अस्तित्वात आणली. त्यामध्ये भारताचे पंतप्रधान-पंडित जवाहरलाल नेहरू, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष--मार्शल टिटो, इजिप्तचे अध्यक्ष--जनरल गमाल अब्दुल नासेर, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष—क्वामे नाख्रुमा, यांच्या नेतृत्वाखाली चळवळीची सुरुवात 1961 मध्ये बेलग्रेड येथील पहिल्या संमेलनातूनच झाली. परंतु अलिप्ततावादी चळवळीची खरी सुरुवात इंडोनेशियातील बांडूग येथे 1955 मध्ये भरलेल्या संमेलनातून आशिया, आफ्रिका संमेलनातूनझाली असे म्हणता येईल.

**अलिप्ततावादी धोरणाची प्रासंगिकता :**

जगातील आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडातील काही राष्ट्रे दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झाले होते. आणि ते राष्ट्र इंग्लंड् फ्रान्स व पोर्तुगीज यांचे वसाहती राहिलेले होते. म्हणून तत्कालीन परिस्थितीमध्ये काय प्रासंगीकता या चळवळीची होती ते पाहणे आवश्यक आहे. ते आपल्याला खालील प्रमाणे पाहता येईल.

**1) वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वंशावादाचे निर्मूलन :**

आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रांना वसाहतवाद म्हणजे ही राष्ट्रे बऱ्याच कालखंडापासूनवसाहती म्हणून राहिली होती. त्यांच्यावर इंग्लंड् फ्रान्स इत्यादी राष्ट्रांनी राज्य केले होते. म्हणून अशाप्रकारचे वसाहतवादी, साम्राज्यवादी धोरण संपुष्टात आणावे व वंशवादाचे निर्मूलन म्हणजे काही राष्ट्रे हे राज्य करण्यासाठीच अस्तित्वात आली आहेत असा समज नाहीसा व्हावा त्याकरिता ही अलिप्ततेची चळवळ अस्तित्वात आली.

**2) विकसनशील देशांच्या सन्मान व सार्वभौमत्वाच्या बचावाकरिता :**

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडातील काही राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले होते. आणि त्यांना पुन्हा पारतंत्रात जायचे नव्हते कारण जगामध्ये जे दोन गट निर्माण झाले होते त्यापैकी कोणत्याही गटात जर गेले तर त्या देशाच्या वापर तो गट करणार होता. त्या राष्ट्राचे स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण अस्तित्वात राहणार नव्हते. म्हणून नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपले अस्तित्व (सार्वभौमत्व) टिकवायचे असेल तर अशा प्रकारच्या विचारसरणीचा अवलंब करणे आवश्यक होते.

**3) जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये शीतयुद्धाची परिस्थिती निर्माण झाली होती. संपूर्ण जग दोन गटांमध्ये विभागले गेले होते. तिसरे महायुद्ध होते की काय अशा प्रकारची भीतीदायक व संशयास्पद परिस्थिती निर्माण झाली होती म्हणून त्या परिस्थितीमध्ये परिवर्तन करण्यासाठी दोन गटातील मतभेद कमी करण्यासाठी एक नवीन विचार प्रणाली अस्तित्वात आली ती म्हणजे अलिप्ततावाद व यामुळे जगामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी या चळवळीने प्रयत्न केले.

**4) विकासाकरिता आर्थिक व तांत्रिक मदतीची आवश्यकता :**

आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडातील नवीन राष्ट्रे दुसऱ्या महायुद्धानंतर नुकतेच स्वतंत्र झाली होती. त्यामुळे त्यांच्या विकासाकरिता त्यांना दोन्ही गटाकडून आर्थिक व तांत्रिक मदतीची आवश्यकता होती. त्यामुळे कोणत्याही

एका गटात जर प्रवेश केला तर दुसरा गट आपोआपच शत्रू होऊन जाईल. म्हणून कोणत्याही गटात सामील न होता दोन्ही गटाकडून जे मदत मिळेल ते प्राप्त करून घेणे अशाप्रकारचा विचार प्रवाह हा होता.

**5) निशस्त्रीकरण :**

जगामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर मोठ्या प्रमाणात शस्त्रस्पर्धा सुरू झाली होती. भांडवलवादी अमेरिका व साम्यवादी सोव्हियत संघ (रशिया) यांच्यामध्ये परस्परांविषयी अविश्वासाचे व संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे दोन्ही गटांनी मोठ्या प्रमाणात सैनिकी करार करून आपल्या शस्त्रसाठ्यामध्ये वाढ केली म्हणून जगामध्ये भितीदायक वातावरण तयार झाले होते. त्यामुळे अलिप्ततावादी चळवळीमुळे दोन्ही गटांमधील शस्त्रास्त्रस्पर्धा कमी झाली.

**निष्कर्ष :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये जी शांततावादी चळवळ अस्तित्वात आली ती म्हणजे अलिप्ततावादी चळवळ. तिचे मूल्यमापन करताना काही विचारवंतांनी त्या चळवळीवर टीका सुद्धा केली आहे. परंतु त्यामुळे या चळवळीचे महत्त्व कमी होत नाही. कारण या चळवळीने जागतिक स्तरावर (पातळीवर) जी आपली भूमिका वटवलेली आहे ती अविस्मरणीय आहेत. जागतिक शांतता प्रस्थापित करणे, राष्ट्रा-राष्ट्रातील वाद शांततेच्या मार्गाने सोडविणे, इतर राष्ट्रांच्या कारभारात हस्तक्षेप न करणे इत्यादी महत्वपूर्ण उद्देश या चळवळीने प्रस्थापित केले आहेत. त्याचप्रमाणे या चळवळीचा जो महत्त्वाचा उद्देश म्हणजे आर्थिक, सामाजिक प्रगती तो अजून पूर्ण झालेला नाही. त्याचप्रकारे जरी अमेरिका व रशिया यांच्यामधील शीतयुद्ध संपले असले तरी कधी शीतयुद्ध निर्माण होईल हे सांगता येत नाही म्हणून अलिप्ततावादी चळवळीचे अस्तित्व हे आवश्यक आहे. ते नष्ट होऊ शकत नाही.

**संदर्भ :**

1) आंतरराष्ट्रीय संबंध– डॉ. वसंत रायपूरकर.
2) समकालीन विश्व राजनीति - राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद.
3) आंतरराष्ट्रीय संबंध- व्ही. बी. पाटील.
4) अलिप्ततावादी चळवळ कालबाह्य झाली आहे का-लेखक -डॉ. शैलेंद्र देवळणकर.

**संदर्भ-**

१. Shroff Bhomi, Role of Jawaharlal Nehru in Nation Building, JETIR August 2017, Volume 4, Issue 8, ISSN-2349-5162
२. Patil V.T. & Narayan(1998), An Assessment of Nehru’s Contribution to Constitution Making In India, Neharu and Constititionalism: An Overview, Devika Publications: Delhi, pg 105-106
३. Guha R (2007), India After Gandh, Picador Publications: India
४. Butler, Lord (1966), Jawaharlal Nehru- The Freedom for Independence, Cambridge Unversity Press, London
५. https://censusindia.gov.in/ भारतीय जनगणना १९५१ आणि १९६१
६. Kothari Rajni(july 1964), The Meaning of Jawaharlal Nehru, The Economic Weekly
७. https://www.pmindia.gov.in/en/former_pm/shri-jawaharlal-nehru/
८. ‘राज्य पुनर्रचना अधिनियम,१९५५’
९. ‘७ वी घटनादुरुस्ती’ १९५६
१०. http://allahabadmc.gov.in/about_ann.html
११. https://www.navjivanindia.com/india/pandit-nehru-played-an-important-role-in-grooming-indian-cinema-the-film-world-reached-the-pinnacle-with-his-vision (सरदानाप्रदीप, १४ नोव्हेंबर २०१९)